साप्ताहिक

# सहकारनामा

संपादक – अब्बास इसाक शेख मोबा.९०९६७७७७५०

Email :sahkarnamanews@gmail.com

वर्ष १ ले ●अंक –१ ला ●रजि.नं.एमएएचएमएआर ४९९८३,दि.१४/०२/२०१९ ●डिक्ले.नं.एसडीएम/एसआर/०२/२०२१,दि.१०/०६/२०२१ ● सोमवार दिनांक २०/०९/२०२१ ते रविवार २६ /०९/२०२१ ● पाने – ४ ●किंमत–२ रु.

Volume-1st.●Issue-1st. ●Regd.No.MAHMAR49983,Dt.14/02/2019 ●Declaration No.SDM/SR/02/2021, Dt.10/06/2021 ● Monday **Dt.20/09/2021 To 26/09/2021**, ●Page : 4 ● Rs.2/-

## दौंड'मधील तिसऱ्या कुरकुंभ मोरी'च्या कामाची खा.सुप्रिया सुळे यांच्याकडून पाहणी

दौंड(प्रतिनिधी): दौंड : तिसऱ्या कुरकुंभ मोरी (भुयारी मार्ग) कामासाठी लागणारे दोन बॉक्सचे काम ठेकेदाराकडून पूर्ण होऊन दीड वर्ष झाले आहे.

परंतु या बॉक्स पुशिंग कामामध्ये मोठी तांत्रिक अडचण निर्माण झाली आहे ज्यामुळे रेल्वे प्रशासन बॉक्स पुशिंगसाठी परवानगी देत नाही, त्यामुळे आता हे काम केव्हा सुरू होईल हे सांगता येत नाही अशी चर्चा शहरभर होत आहे. मात्र बॉक्स पुशिंगच्या कामामध्ये कोणतीही तांत्रिक अडचण निर्माण झालेली नाही.

आम्ही फक्त पावसामुळे थांबलो आहोत व सदरचे काम लवकरच (२५ ऑक्टोबर) सुरू करीत आहोत असा खुलासा रेल्वेचे वरिष्ठ विभागीय अभियंता सुरेंद्र कुमार यांनी केला आहे.

खासदार सुप्रिया सुळे या कुरकुंभ मोरी कामाचा आढावा घेण्यासाठी दौंड मध्ये आल्या होत्या त्यावेळी रेल्वे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी या कामा बाबतची माहिती दिली. त्यामुळे आता लवकरच बहुचर्चित तिसऱ्या कुरकुंभ मोरीच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात होणार आहे अशी आशा दौंडकर नागरिकांनी करण्यास हरकत नाही.

यावेळी मा. आमदार रमेश थोरात, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे ता. अध्यक्ष आप्पासो पवार, शहराध्यक्ष गुरुमुख नारंग, जिल्हा परिषद सदस्य वीरधवल जगदाळे, ज्येष्ठ नगरसेवक बादशहा शेख, रेल्वेचे ठेकेदार राजेंद्र उगले तसेच पक्षाचे पदाधिकारी, नगरसेवक उपस्थित होते. सदर मोरीचे काम मागील सात वर्षापासून काहीना काही कारणामळे रेंगाळतच चालले आहे. त्यामुळे आता खुद्द खा.सुप्रिया सुळेच हे काम पूर्ण करण्यासाठी लक्ष देत आहेत. व वेळोवेळी दौंडला येऊन कामाची पाहणी करीत आहेत. दि.१४ सप्टेंबर रोजी सुद्धा सुळे यांनी सदर कामाची पाहणी करीत पुढील कामांबाबत संबंधित रेल्वे अधिकाऱ्यांशी चर्चा केली व काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना केल्या, तसेच दि. २ नोव्हेंबर रोजी दौंडला पुन्हा येऊन कामाची प्रगती कुठपर्यंत झाली आहे याची पाहणी करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

खा.सुळे यांनी येथील उपजिल्हा रुग्णालयाला ही भेट दिली, व या ठिकाणी नव्याने होत असलेल्या १०० खाटांच्या दवाखाना इमारतीच्या कामाची व ऑक्सिजन प्लांट कामाची पाहणी करत संबंधित अधिकाऱ्यांकडून कामाबाबतची माहिती घेतली. दवाखाना इमारतीच्या भूमीपूजनासाठी



तिसऱ्या कुरकुंभ मोरीची पाहणी करताना खा.सुप्रिया सुळे व रेल्वे प्रशासनाचे अधिकारी

उपमुख्यमंत्री अजित पवार व आरोग्य मंत्री राजेश टोपे यांची वेळ घेऊन भूमिपूजनाच्या कार्यक्रमाचे नियोजन करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## पाटस येथील विद्युत टॉवर तोडून सरकारी मालमत्तेचे

### ३ कोटी ५० लाखांचे नुकसान, २ आरोपींना यवत पोलिसांनी केली अटक

दौंड (प्रतिनिधी): दौंड तालुक्यातील पाटस येथे महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी म्हणजेच महापारेषण या सरकारी कंपनीचे ३ टॉवर अज्ञात इसमांनी तोडून ते जमीनदोस्त केल्याची घटना काल घडली होती. यात सरकारी मालमत्तेचे सुमारे ३ कोटी ५० लाख रूपयांचे नुकसान झाले होते. मात्र यवतचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी युद्ध पातळीवर या घटनेचा तपास करून या गुन्ह्यातील २ आरोपींना अटक केली आहे.

प्रदीप माणिक खारतोडे आणि संजय बापू गाढवे (दोघे रा. खारतोडेवस्ती, पाटस, ता.दौंड) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून पोलीस निरीक्षक नारायण पवार आणि त्यांच्या यवत, पाटस पोलीस स्टाफने रात्री १ वाजण्याच्या



जमीनदोस्त झालेल्या टॉवरची पाहणी करताना पोलीस

सुमारास या आरोपींना मोठ्या शिताफीने पकडले आहे. आरोपींना आज न्यायालयात हजर केले असता त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

दौंड तालुक्यातील पाटस येथे महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी म्हणजेच महापारेषण या सरकारी कंपनीचे ३ टॉवर अज्ञात इसमांनी तोडून ते जमीनदोस्त केल्याची घटना घडली होती. यात सरकारी मालमत्तेचे समारे ३ कोटी ५० लाख रूपयांचे नुकसान झाले होते. याबाबत विठठल मारूती कांबळे (व्यवसाय नोकरी,वय ४५, रा.सध्या, गोपाळवाडी ता.दौंड) यांनी फिर्याद दिली होती.

कांबळे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दि.१२ सप्टेंबर ते

(पान २ वर पुढे....)

## ४१ वर्षांपासून फरार असलेला दरोड्यातील आरोपी जेरबंद



४१ वर्षे पोलीसांना चकवणारा फरार आरोपी अंकुश माणिक गायकवाडसह पोलीस पथक

दौंड (प्रतिनिधी): दौंड : यवत पोलीस ठाणे हद्दीत दरोडा टाकून तब्बल ४१ वर्षे एक आरोपी पोलिसांना चकवत फरार राहिला, मात्र अखेर पुणे ग्रामिण एलसीबीने त्याला गाठून जेरबंद केले आहे.

दि १५/९/२०२१ रोजी मा पोलिस अधिक्षक डॉ अभिनव देशमुख यांनी जिल्ह्यातील वॉन्टेड फरार आरोपी यांचा शोध घेऊन कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

वरील आदेशानुसार सनिक गुन्हे शाखेचे एक पथक जुने रेकॉर्ड

(पान २ वर पुढे....)

# संपादकीय

## कोरोना अजून गेला नाही, पण...

गेल्या दोन वर्षांमध्ये संपूर्ण जगामध्ये कोरोना रुपी राक्षसाने अक्षरशः थैमान घातले होते. संपूर्ण देश याच्या कचाट्यात सापडला होता. पण म्हणतात ना प्रत्येक गोष्टीचा शेवट हा ठरलेलाच असतो. कोरोनाच्या बाबतीतही तसंच काहीसं घडेल. मात्र रुग्ण संख्या कमी झाली म्हणून कोरोना गेला, हद्दपार झाला आणि कोविड सेंटरमधील व्हेंटिलेटरही गाशा गुंडाळून ठेऊन देणे हे मात्र चुकीचे ठरेल. कारण कोरोना हा हद्दपार

होईलच पण तो आत्ताच होईल हे म्हणणे किंवा मानणे थोडे घाईचे ठरणार आहे. कारण कोरोना अजून पूर्णपणे गेलेला नाही तर तो लोकांच्या आसपास आहेच आणि याचे उदाहरण म्हणजे अजूनही विविध तालुक्यांत, गावांत दररोज कमीत कमी दहा-बारा लोक हे कोरोना पॉझिटिव्ह आढळून येत आहेत आणि त्यांना उपचारासाठी कोविड सेंटर आणि दवाखाने धुंडाळावे लागतच आहेत.

त्यामुळे रुग्ण सापडत असतानाही विविध रुग्णालयांत बसविण्यात आलेले व्हेंटिलेटर लगोलग बंद करणे किंवा त्यावर लक्ष ठेवणारा स्टाफ पूर्णपणे कमी करणे हे धोक्याचे लक्षण दिसत आहे. एकट्या दौंड तालुक्यातच अनेक कोविड सेंटर सुरू होती. ती आता बंद झालेली दिसत आहेत परंतु कोरोनाचे रुग्ण कमी झाले असले तरी त्यांचा आकडा हा पूर्णपणे शून्यावर नक्कीच आलेला नाही. त्यामुळे तालुक्यातील महत्वाच्या ठिकाणचे कोविड सेंटर सुरू ठेवणे आणि त्यातील व्हेंटिलेटर सुविधा सुरू राहणे ही सध्याच्या काळाची तरी गरज नक्कीच आहे. अनेक रुग्णालयातील ऑक्सिजन बेड सुरू असले तरी व्हेंटिलेटर बेड मात्र बंद करण्यात आलेले आहेत. त्यामुळे रुग्णालयातील रुग्णांचा स्कोर जर वाढला तर त्यांना दुसऱ्या खाजगी दवाखाण्यात दाखल करण्याशिवाय पर्याय राहत नाही. आणि व्हेंटिलेटर ची गरज असणाऱ्या रुग्णाची आणि त्याच्या परिवाराचीमात्र मोठी फरफट होताना दिसते. त्यामुळे जो पर्यंत कोरोना पूर्णपणे जात नाही तोपर्यंत सरकारी रुग्णालयातील व्हेंटिलेटर बेड पूर्णपणे बंद करणे हे चुकीचे ठरणार आहे.

# बिअरबार मालकाने नगरपालिकेच्या जागेत केलेले अतिक्रमण अखेर काढले



नगरपालिकेच्या मालकीच्या जागेमध्ये येथील एका बिअरबार मालकाने केलेले अतिक्रमण

दौंड (प्रतिनिधी): दौंड -गोपाळवाडी रोड परिसरातील सावंत नगर येथे दौंड नगरपालिकेच्या मालकीच्या जागेमध्ये येथील एका बिअरबार मालकाने अतिक्रमण केले होते.

सामान्य माणसांची अतिक्रमणे पाडणारी नगरपालिका या धनाढ्य बिअरबार मालकाचे अतिक्रमण का पाडत नाही याबाबत प्रश्न उपस्थित केले जात होते. या सर्व घडामोडींचा परिणाम होऊन बिअरबार मालकाने स्वतःहून सदरचे अतिक्रमण काढले असल्याचे चित्र दिसते आहे. दौंड नगरपालिकेने या बिअरबार मालकाला ना हरकत दाखला दिला तसेच बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देऊन सहकार्य केले तरीही या मालकाने नगरपालिकेच्याच जागेत अतिक्रमण केले आहे हे निदर्शनास येत होते. त्यामुळे या प्रभागाचे(क्र.१०) नगरसेवक जीवराज पवार यांनी सदरच्या अतिक्रमणा बाबत नगरपालिकेकडे तक्रार करून ते काढण्याची मागणी केली होती. परंतु त्याकडे दुर्लक्ष करित तब्बल अडीच महिने नगरपालिकेने अतिक्रमणावर काहीच कारवाई केलेली नाही ही बाबही जनतेसमोर आणली गेली होती.

हे पाहून नगरपालिकेतील राष्ट्रवादी कॉंग्रेस, मित्र पक्षाचे गटनेते बादशहा शेख व इतर नगरसेवकांनी नगरपालिकेला इशारा दिला होता की सदरचे अतिक्रमण निघाले नाही तर आम्ही प्रशासनाच्या विरोधात गुन्हा दाखल करून नगरपालिकेचे कामकाज बंद पाडू. नगरपालिकेने दि.२४ जून रोजी अभय चंद्रमोहन सावंत व इतर यांना सदरच्या अतिक्रमणा बाबत नोटीस काढून ते स्वतःहून काढण्या बाबतची सूचना केलेली होती, अन्यथा नगरपालिकेस कारवाई करणे भाग पडेल असा इशाराही दिला होता. तरीही संबंधितांनी अतिक्रमण काढलेले नाही हे दिसून येत असल्याने या विरोधात आवाज उठवित अतिक्रमण काढण्यासाठी पाठपुरावा केला होता. आज अखेर सदरचे अतिक्रमण निघून नगरपालिकेची जागा मोकळी झाली असल्याचे पहायला मिळत आहे.

# मुस्लिम बांधवांनी केले गणेश मंडळांचे स्वागत


मुस्लिम समाजाच्या वतीने गणेश मंडळांचे स्वागत करताना हाजी सोहेल खान व बादशहा शेख

दौंड(प्रतिनिधी): शहरातील हिंदू-मुस्लिम ऐक्याची परंपरा कायम राखीत दौंड मधील मुस्लिम बांधवांनी गणेश विसर्जनासाठी आलेल्या मंडळांचे हार नारळ देत स्वागत केले. येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये दरवर्षी मुस्लिम समाजाच्या वतीने गणेश मंडळांचे स्वागत करण्यात येते, मुस्लिम बांधवांनी यावर्षीही हीच परंपरा कायम करीत भाई चाऱ्याचे दर्शन घडविले. शाही आलमगीर मशिदीचे मख्य विश्वस्त युसुफ इनामदार, ज्येष्ठ नगरसेवक बादशहा शेख, मा.नगरसेवक इस्माईल शेख, राष्ट्रवादी कॉंग्रेस अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष सोहेल खान, नगरसेवक वसीम शेख,मन्नान इनामदार, उबेद खान, जावेद सय्यद, अल्ताफ सय्यद, मोहसिन शेख आदींनी सदरचा उपक्रम राबविला.कोरोना च्या पार्श्वभूमीवर साजरा होत असलेला गणेशोत्सव गणेश मडळांनी आपल्या भावनांना मुरड घालीत अत्यंत साधेपणाने परंतु उत्साहात साजरा केला. त्याच प्रमाणे गणेश भक्तांनी पोलीस प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करीत बाप्पांचे विसर्जनही अत्यंत शांततेत पार पाडले.पो. निरीक्षक विनोद घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

पान १ वरुन पुढे....

### पाटस येथील विद्युत टॉवर तोडून....

दि.१३ सप्टेंबरच्या मध्य रात्री कोणीतरी अज्ञात इसमांनी पाटस ता.दौंड येथील जमीन गट नं.११४६ मध्ये महाराष्ट्र शासन, महापारेषण महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे सरकारी ३ विद्युत टॉवर कशाच्यातरी सहाय्याने जमीनीपासून कट करून टॉवर खाली पाडून सरकारी मालमत्तेचे अंदाजे साडे तीन कोटी रूपयांचे नुकसान केले

पान १ वरुन पुढे....

### ४१ वर्षांपासून फरार.....

वरील फरार आरोपी यांचा शोध घेत असताना गोपनीय बातमीदार मार्फत मिळालेल्या माहिती वरून यवत पोलिस स्टेशन गु र नं २५/१९८० भा द वी ३९५ या गुन्ह्यातील आरोपी अंकुश माणिक गायकवाड (वय ५८ वर्षे,रा खडकी ता. करमाळा जि.सोलापूर) हा गुन्हा घडले पासून तब्बल ४१ वर्षे फरार होता. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्यास सापळा रचून करमाळा खडकी रोडवर जनावरे चरायला घेऊन फिरत असताना शिताफीने ताब्यात घेतले आहे. सदर गुन्ह्याबाबत विचारपूस केली असता त्याने वरील गुन्हा केला असल्याचे सांगितलेवरून त्यास पुढील तपास करीता वैद्यकीय तपासणी करून यवत पोलिस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदरची कारवाई ही पोलिस अधिक्षक डॉ अभिनव देशमुख सो यांचे नेतृत्वाखाली अप्पर पोलिस अधिक्षक मिलिंद मोहिते यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरीष्ठ पोलिस निरीक्षक अशोक शेळके, पो.उप निरीक्षक शिवाजी ननवरे, पो हवा विजय कांचन, पो.का.धिरज जाधव, पो.कॉ.दगडू विरकर यांनी केली आहे

# राजू जाधव यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

दौंड (प्रतिनिधी): आमदार राहुल कूल व ज्येष्ठ नगरसेवक प्रमसुख कटारिया यांचे अत्यंत विश्वासू कार्यकर्ते व ख्रिश्चन समाजाचे युवा नेतृत्व राजू जाधव यांचा वाढदिवस विविध पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी उत्साहात साजरा केला. कटारिया यांचा वाढदिवस कार्यकर्त्यांनी नुकताच साजरा केला.

ज्या कार्यकर्त्यांनी आपला वाढदिवस साजरा केला त्यांचा वाढदिवस ही कटारिया तितक्याच उत्साहात साजरा करतात. त्यांच्या या परंपरेप्रमाणे कटारिया यांनी आपल्या कार्यालयात राजू जाधव याचा वाढदिवस शाल, पुष्पगुच्छ देत साजरा केला व राजुला पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी मा.नगराध्यक्ष योगेश कटारिया, नगरसेवक बबलू कांबळे, गोविंदबाबू अग्रवाल, अमोल सोनवणे, रियाज पटेल आदी उपस्थित होते. राजू जाधव हे सर्वांशीच मन मिळावूपणे वागत असल्याने सर्वच राजकीय गटाशी त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. त्यामुळेच राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नगरसेवक बादशहा शेख, उपनगराध्यक्ष विलास शितोळे, नगरसेवक गौतम साळवे यांनी सुध्दा राजू जाधव याचा वाढदिवस नगरपालिका कार्यालयात साजरा करीत त्याला शुभेच्छा दिल्या. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, पश्चिम महाराष्ट्र युवा आघाडीचे उपाध्यक्ष सतीश थोरात, मराठा महासंघाचे शहराध्यक्ष शैलेंद्र पवार, हिंदू एकता मंच दहीहंडी उत्सव समितीचे मुख्य आयोजक रुपेश कटारिया, वीरधवल जगदाळे युवा प्रतिष्ठान चे अध्यक्ष उमेश जगदाळे, मा. उपनगराध्यक्ष अनिल सोनवणे, ॲड. अमोल काळे व मित्र परिवाराने राजू जाधव याचा वाढदिवस केक कापून साजरा केला व त्यास पुढील राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



राजू जाधव यास वाढदिवसानिमित्त शाल, पुष्पगुच्छ देवून स्वागत करताना प्रेमसुख कटारिया, गोविंदशेठ अक्षवाल व ईीर

# दौंड नगरपरिषदेकडून प्लास्टिक पिशवी व थर्मोकोल मुक्त दौंड रॅलीचे आयोजन



शहरातील व्यापारी वर्गाला गांधीगिरीने कापडी पिशव्या भेट देताना नगरसेविका प्रणोती चलवादी

दौंड(प्रतिनिधी) : दौंड नगरपरिषदेकडून माझी वसुंधरा अभियान आणि स्वच्छ सर्वेक्षण २०२१ अंतर्गत प्लास्टिकचा वापर करु नका आणि कापडी पिशवी वापरा हा संदेश देण्यासाठी दौंड नगरपरिषदेच्या आरोग्य सभापती प्रणोती मंगेश चलवादी यांच्या हस्ते शहरातील व्यापारी वर्गाला गांधीगिरीने कापडी पिशव्या भेट देण्यात आल्या.

तसेच पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी प्लास्टिक पिशव्या, प्लास्टिकचे भांडे, चमचे, वाट्या तसेच इतर उत्पादने वापरू नये असा संदेश देण्यात आला. या रॅली चा प्रारंभ येथील महात्मा गांधी चौकामधून करून शहरातील शालीमार चौक, गोपाळवाडी रोड या मार्गेकापडी पिशवी वाटप करून, शहर प्लास्टिक मुक्त करून कापडी पिशवी वापरा असा संदेश देण्यात आला. या कार्यक्रम दरम्यान चालता बोलता आणि प्रेमाने प्लास्टिकला पर्यायी आणि पर्यावरण पूरक गोष्टीचा वापर करून माझी वसुंधरा आणि स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली. रॅली ध्ये दौंड नगरपरिषदेच्या आरोग्य सभापती प्रणोती चलवादी, आरोग्य निरीक्षक शाहू पाटील, मुकादम रवि जाधव, शुभम चौकटे,प्रवीण खुडे, नितीन तुपसौंदर्य, विनोद चितारे तसेच सर्व कर्मचारी यांनी सहभाग घेतला.

# धक्कादायक...संदीप लगड हा निवृत्त मेजर नाही, फसवणुकीचा गुन्हा दाखल

दौंड(प्रतिनिधी):निवृत्त मेजर असल्याचे भासवून फसवणुक करणाऱ्या इसमावर दौंडमध्ये गुन्हा दाखल करण्यात आल्याची कारवाई करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार चंद्रशेखर जनार्धन रानडे (वय ६५ वर्ष व्यवसाय सोवानिवृत्त लेप्ट,कर्नल, रा. बी. १७, १/५ सेक्टर १ साईबाबा मंदीराजवळ, वाशी नवी मुंबई ४००७०३) यांनी तक्रार दिली होती की इसम नामे संदीप वामन लगड (रा.बोरीबेल,ता.दौंड,जि.पुणे)हा रेजीमेंट आफ आर्टीलरी विभाग, नाशिक रोड या सैन्य दलाच्या तुकडीत नाईक या पदावर कार्यरत असताना सैन्य दलाच्या तुकडीतुन पळून आलेला असल्यामुळे त्याला सेवेतुन काढुन टाकण्यात आलेले असताना तो माजी सैनिक असे स्वता:ला म्हणवुन अवैध्यरित्या निवृत्त सैनिकी अधिकारी मेजर. संदीप (भाऊ) लगड असे असल्याचे सांगतो, वावरतो व स्वत:ची प्रसध्दी करतो. तसेच त्रिदल सैनिक सेवा संघ या संस्थेच्या छत्राखाली आजी सैनिकांचे कल्याणाँी असंवैधानीक विधाने करतो. माजी सैनिक व त्यांचे कुटुंबीयांचे सभासद नोंदणी करीता स्वताहाचे फायद्यासाठी पैशाची देवाण घेवाण करून संघटनेला हाताशी घेवुन सैनिक कल्याण विभाग व सैनिक कल्याण मंत्री यांचेकडे मी निवृत्त सैनिक मेजर असल्याचे भासवुन चर्चा व अडचणी सोडवतो असे भासवुन प्रसिध्दी मिळवुन त्या भेटीचे व्हीडीओ सोशल मिडीयावर प्रसारीत करतो. तसेच तो मिलीटरी सैन्याचे मोनोग्राफ सैन्याची कॅम्प याचा वापर करतो तसेच त्याचे गाडीवर समोर अशोक स्तंभाचा वापर करतो असे नमूद केले होते. सदर बाबत श्री चंद्रशेखर रानडे, सोवानिवृत्त लेप्ट. कर्नल यांनी दिले फिर्यादीवरुन भा.द.वि.स.कलम १७०, ४२० प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील अधिक तपास श्री विनोद घुगे, पोलीस निरीक्षक दौंड पोलीस स्टेशन यांचे मार्गदर्शना खाली ऋषिकेश अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक हे करीत आहेत.दि. ११/ ०९/२०२१ रोजी ११:४५ वा ते १२:०० वा चे दरम्यान दौंड ता.दौंड जि.पुणे गावचे हद्दीत एस.डी.पी.ओ ऑफिस मध्ये येवुन इसम नामे १) संदीप वामन लगड, (रा. बोरीबेल ता. दौंड जि.पुणे) २) ॲड. रेश्मा चौधरी (रा. पाबळ ता. शिरूर जि.पुणे) व दोन अनोळखी इसम यांनी शिकापुर पोलीस स्टेशन हद्दीतील दिनेश छबन चौधरी (रा. पाबळ ता. शिरूर जि.पुणे) यांचा ४२० कलमा अन्वये फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यास परवानगी का देत नाही असे म्हणुन ऑफीस मध्ये येवुन आरेरावीची भाषा वापरली त्यावेळी महिला पोलीस यांनी रेश्मा चौधरी यांना तुम्ही फोन बाहेर गेल्यावर करा असे म्हणताच त्यांनी महिला पोलिसांचा हात झटकुन, धक्का देवुन, तु बाजुला सर नाहीतर मी तुझ्याकडे पण बघते असे म्हणुन सरकारी कामात अडळा आणला आहे. म्हणुन भा.द. वि.का कलम ३५३, ३३२, ५०६,३४ प्रमाणे श्रीमती छाया ज्ञानेश्वर जगताप महीला पोलीस हवालदार यांनी दिलेल्या फिर्यादी वरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील अधिक तपास श्री.विनोद घुगे, पोलीस निरीक्षक दौंड पोलीस स्टेशन यांचे मार्गदर्शना खाली टी.पी.राठोड, सहा.पोलीस निरीक्षक, दौंड पोलीस स्टेशन हे करीत आहेत. सदर दोन्ही गुन्हयातील आरोपी विरुध्द कोणाची फसवणुकीबाबतची तक्रार असल्यास त्यांनी पोलीस निरीक्षक, श्री विनोद घुगे, दौंड पोलीस स्टेशन यांचेशी संपर्क करावा असे आवाहन दौंड पोलिसांनी केले आहे.

# वाहन चालकांकडून दादागिरीने पैसे वसूल करणाऱ्या तृतीय पंथीयांचा पो.नि.विनोद घुगे यांनी ४८ तासात केला बंदोबस्त



दौंड (प्रतिनिधी): शहरातील अष्टविनायक मार्गावरील संत मदर तेरेसा (नगर मोरी) चौकामध्ये तृतीय पीय टोळी प्रत्येक वाहन चालकांकडून दादागिरीने खंडणी गोळा केल्या प्रमाणे पैसे वसूल करीत होते. या टोळी समोर वाहन चालक, स्थानिक व्यापाऱ्यांसह लांब पल्ल्याचा प्रवास करणारे प्रवासी अक्षरशः जेरीस आले होते. या त्रासाबाबत सहकारनामा' ने परखड वृत्त देत बातमी प्रसिद्ध केली होती. या बातमीची गांभीर्याने दखल घेत दौंड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी ४८ तासातच या टोळीचा चांगलाच बंदोबस्त करून त्यांना येथून हद्दपार केल्याचे पहायला मिळत आहे.

तृतीय पीय टोळके मुख्य चौकात रस्त्याच्या मधोमध उभे राहुन येणारे-जाणारे प्रत्येक वाहन अडवून वाहन चालकांना दादागिरी करीत पैसे वसूल करीत होते. पैसे नाकारणाऱ्या वाहन चालकांना अश्लील हावभाव करून शिवीगाळ करीत त्यांच्याकडून बळजबरीने पैसे घेतले जात होते. हा सर्व अश्लील प्रकार दौंडमध्ये पहिल्यांदाच पाहायला मिळत होता. वाहन चालकांकडून होणाऱ्या पैशाची लूट भर दिवसा व पोलिसांसमोर होत असतानाही त्यांच्यावर कारवाई होत नव्हती. स्थानिकांसह पोलिसही या टोळक्या समोर हतबल झाल्याचे दिसत होते. सरकारनामा'ने बातमीच्या माध्यमातून हा चाललेला किळसवाणा प्रकार समोर आणला. त्याची पो. नि. घुगे यांनी तत्परतेने दखल घेतली व पोलिसांना या मुजोर टोळक्यांना येथून हद्दपार करण्याच्या सूचना केल्या. घुगे यांच्या आदेशानंतर ४८ तासातच पोलिसांनी या टोळीला तंबी देत त्यांना दौंड मधून हूसकावून लावले आहे. दौंड पोलिसांच्या कारवाईचे स्वागत करीत स्थानिक रहिवासी, वाहन चालक, व्यापारी आणि प्रवाश्यांनी पो.नि. घुगे व पोलीस प्रशासनाचे आभार मानले आहेत.

# दौंड रेल्वे ट्रॅकजवळ ३ अज्ञात इसमांनी एकास लुटत ३४ हजारांचा मुद्देमाल केला लंपास

दौंड (प्रतिनिधी): दौंड : दौंड शहरातील एका इसमास दौंड रेल्वे ट्रॅकच्या शेजारी असणाऱ्या खडीवर तो निवांत बसला असताना त्यास ३ अज्ञात इसमांनी लुटल्याची गंभीर घटना घडली आहे. या इसमाच्या फिर्यादीवरून पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार फिर्यादी महेंद्र नारायण खरात (रा.भोईटेनगर, दौंड) हे रात्री ८ वाजता दौंड रेल्वे स्टेशनच्या ग्राउंड शेजारी दौंड-सोलापुरकडे जाणारे रेल्वे ट्रॅक जवळ खडीचे ढिगाऱ्यांवर बसले असताना त्या ठिकाणी तीन अज्ञात इसम आले व त्यातील दोघांनी खरात यांच्या डोक्यात काठी सारख्या वस्तुने प्रहार करून तिघांनी लाथुक्यांनी मारहाण केली. यावेळी या आरोपींनी खरात यांच्या खिशातील रोख रक्कम, रु. समसंग कंपनीचा ३ हजार रु.मोबाईल व



सध्या मोकळे सुनसान असलेले दौंड रेल्वे जंक्शन

३० हजार रुपयांची एच एम डिलक्स मोटार सायकल क्र. एम.एच ४२ ए. डब्यु ७१४५ हे जबरदस्तीने फिर्यादी यांच्याकडून हिसकावुन घेवुन गेले. हा प्रकार घडल्यानंतर फिर्यादी यांनी दौंड पोलीस ठाण्यात जाऊन रितसर फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई आबनावे हे करीत आहेत.

# राहू येथील रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

दौंड (प्रतिनिधी): आज गुरुवार दि.१६ सप्टेंबर रोजी हनुमान मदिर राहु (ता.दौंड) येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये ५४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदान शिबिराची सुरुवात राहू येथील सरपंच श्री.दिलीप रामराव देशमुख व प्राथमिक आरोग्य केंद्र राहू येथील वैद्यकीय अधिकारी डॉक्टर श्री.मोहन पांढरे सर यांच्या हस्ते करण्यात आली. राहु यथे कोरोना लसीकरण होऊनही युवकांनी रक्तदान शिबिरासाठी उत्स्फुर्तपणे प्रतिसाद दिला हे विशेष.

सदर संकलन केलेले रक्त सह्याद्री हॉस्पिटल डेक्कन जिमखाना पुणे यांच्याकडे सुपूर्त करण्यात आले असून सह्याद्री ब्लड बँकेच्या सौ.अनघाताई पळसकर व इतर सहकारी यांचे विशेष सहकार्य मिळाले. शिबिरामध्ये राहूचे सरपंच श्री.दिलीप देशमुख, डॉक्टर श्री.मोहन पांढरे, पोलीस पाटील श्री. सुरेश सोनवणे, श्री.रामभाऊ कूल पत्रकार श्री. रवींद्र खोरकर, भारतीय जैन संघटनेचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष श्री. हर्षल भटेवरा, श्री. विशल्या नर्मदा सेवा समितीचे प्रसाद खुंटे, शंभूराजे युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री.मनोज नवले, हर्षल चव्हाण, खंडू रणदिवे, तुषार ढमढेरे, निखिल काळभोर किराणा व्यापारी असोसिएशनचे सुनील भटेवरा, अतुल तांबे, धरमचंद भटेवरा, कल्याण तांबे, अखिल भारतीय मराठा महासंघाचे लक्ष्मण कदम पाटील, सौ.मनीषाताई नवले इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या शिबिराचे आयोजन शंभूराजे युवा प्रतिष्ठान राहू, भारतीय जैन संघटना,


शिबिरातील रक्तदाता रक्तदान करीत असताना आरोग्य कर्मचारी व सरपंच

दौंड पत्रकार संघ, किराणा व्यापारी असोसिएशन, श्री.विशल्या नर्मदा सेवा समिती व अखिल भारतीय मराठा महासंघाने केले होते. सध्या कोरोना लसीकरण सुरू असल्यामुळे सर्वत्र रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे युवकांनी स्वयंस्फुर्तीने पुढे येऊन रक्तदान करावे असे आवाहन भारतीय जैन संघटनेचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष श्री हर्षल भटेवरा यांनी केले आहे. आणि कोरोना लस घेतल्यानंतर १४ दिवसांनी व कोरोना झालेल्या व्यक्तींना डिस्चार्ज मिळाल्यानंतर २८ दिवसांनी रक्तदान करता येते अशी माहिती हर्षल भटेवरा यांनी दिली.

## कासुर्डीत १०० केव्ही डीपीतील ४५ हजारांच्या तारा चोरीला

दौंड :दौंड तालुक्यातील कासुर्डी यील १०० केव्ही विद्युत डीपी फोडून त्यातील ४५ हजार रुपयांच्या तारा अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे.

यवत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार कासुर्डी गांवच्या हद्दीमध्ये मुळा-मुठा कॅनॉलचे कडेला असणाऱ्या १०० केव्ही विद्युत डीपीचे नट बोल्ट अज्ञात चोरट्यांनी खोलून डिपी स्ट्रक्चरवरून खाली पाडून डि.पी.मधील १०० लिटर ऑईल जमिनीवर सोडून दिले व त्यातील तांब्याच्या तारा काढून त्या चोरून घेवून गेल्याची घटना घडली आहे. याबाबत वरिष्ठ तंत्रज्ञ प्रकाश नरसिंग भोसले यांनी यवत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून त्यांच्या फिर्यादीवरून यवत पोलिसांनी अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल केला आहे.

# दौंड मधील अष्टविनायक मार्गाच्या मख्य चौकात तृतीय पंथीयांची वाहन चालकांकडून पैसे वसुली


संत मदर तेरेसा चौकात चालकांकडून खंडणी वसूल करणारा तृतीयपंथीय

दौंड (प्रतिनिधी): दौंड शहरातील अष्टविनायक मार्गावरील संत मदर तेरेसा चौकात (नगर मोरी) तृतीयपीय टोळी वाहन चालकांकडून अक्षरशा खंडणी वसूल केल्याप्रमाणे पैसे गोळा करीत आहे.

तृतीयपीय मुख्य चौकात रस्त्याच्या मधोमध थांबून येणारे - जाणारे प्रत्येक वाहन अडवून दादागिरी करीत पैसे उकळत आहेत. यांना पैसे नाकारणाऱ्या वाहनचालकांना अश्लील हावभाव करून व शिवीगाळ करीत पैसे घेतले जात असल्याचेही स्थानिक सांगत आहेत.

असला घाणेरडा प्रकार दौंडमध्ये याआधी कधीच पाहण्यात येत नव्हता. परंतु सध्या रोजची ड्युटी असल्याप्रमाणे हे टोळके चौकात येऊन वाहनचालकांना लुबाडण्याचे काम नित्य नेमाने करीत आहे. हा सर्व अश्लील प्रकार भर दिवसा व पोलिसांसमोर होत असताना कोणीच या टोळीला मज्जाव करताना दिसत नाही. त्यामुळे निर्ढावलेले हे टोळके बिनधास्तपणे कोणालाही न घाबरता हप्ता वसुली करताना दिसत आहे. पोलिसांना या सर्व प्रकाराबाबत तक्रार करूनही पोलिसांकडून अद्याप कोणतीही कारवाई या ठिकाणी झालेली दिसत नाही. आजही सकाळपासून तृतीयपंथीय वाहन चालकांकडून पैसे लुटताना दिसतच आहेत. या मार्गावरून जाणारा प्रत्येक वाहन चालक या प्रकाराला वैतागला आहे व तितकाच हतबल सुद्धा आहे.

दौंड पोलिसांसमोरच हा सर्व किळसवाणा प्रकार सुरु असून सुद्धा त्यांच्यावर कारवाई होत नसेल तर आता यांची तक्रार नेमकी कोणाकडे करावयाची असा प्रश्न उपस्थित होत आहे.

हा सर्व प्रकार चालू असताना या चौकातून जाणाऱ्या महिला शरमेने मान खाली घालून जाताना दिसतात. त्यामुळे,अरे कोणीतरी आवरा यांना अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.

# दौंड'मध्ये मटका अड्ड्यावर पोलिसांची कारवाई, भिमनगर परिसरातील गांजा विक्रेत्यांवर कारवाईची मागणी

दौंड (प्रतिनिधी): दौंड शहरातील गांधी चौक परिसरातील मटका (जुगार) अड्ड्यावर दौंड पोलिसांनी धाड टाकीत कारवाई केली. याप्रकरणी सचिन दीपक गुंजाळ (रा.वडार गल्ली, दौंड) याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याकडील जुगाराची साधने व रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.

गांधी चौकातील माही मिसळ नावाच्या हॉटेलमध्ये कल्याण मटका नावाचा बेकायदा जुगार चालत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी सदर अड्ड्यावर कारवाईची सूचना केली.पो.उपनिरीक्षक महेश आबनावे, पो.कर्मचारी विकास गावडे, हेमंत भोंगळे यांनी या ठिकाणी छापा टाकला असता सचिन गुंजाळ लोकांकडून पैसे घेऊन कल्याण मटका घेत असताना मिळून आला. पुढील तपास पो. हवा. पांडुरंग थोरात करीत आहेत. शहरातील भीम नगर परिसरात सर्रासपणे गांजा विक्री होत असल्याची तक्रार स्थानिकांकडून होत आहे. रात्रीच्या वेळेस या परिसरात ठीक ठिकाणी गर्दुल्ले गांजा ओढत बसत असल्याने संपूर्ण परिसरात गांजाची दुर्गंधी पसरत आहे त्यामुळे येथील नागरिक या त्रासाने त्रस्त झाले आहेत. येथील गांजा विक्रेत्यांवर कारवाईची मागणी होत आहे.

सहकारनामा हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक-अब्बास इसाक शेख यांनी प्रीती प्रिंटींग प्रेस, हरिकृपानगर, मार्केट यार्ड जवळ, इंदापूर रोड, बारामती,जि.पुणे(महाराष्ट्र) येथे छापून केडगाव, मस्जिद जवळ, ता.दौंड,जि.पुणे, पिन ४१२२०३(महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले.
This Newspaper weekly Sahkarnama Printer, Publisher, Owner & Editor by Abbas Isak Shaikh and Printed by Priti Printing Press, Harikrupa Nagar, Market Yard Baramati, Dist.Pune-413102 and Published by At/Post.Kedgaon, Near Masjid, Tal.Daund, Dist.Pune-412203 (Maharashtra), Mob : 9096777750